दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## आजचे पंचांग

दिनांक : २९ जुलै २०२६ वार : बुधवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : पौर्णिमा तिथी (रात्री ०८:०५ पर्यंत) त्यानंतर प्रथम तिथी नक्षत्र : उत्तराषाढा नक्षत्र (दुपारी ०३:३६ पर्यंत) त्यानंतर श्रवण नक्षत्र योग : प्रीति योग (रात्री ११:५७ पर्यंत) त्यानंतर आयुष्मान योग करण : विस्ती भद्रा करण (सकाळी ०७:१४ पर्यंत)

## सुप्रिया सुळे-अमित शाहांची भेट

**दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीने पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) अजित पवारांच्या राष्ट्रवादीत विलीन होऊन एनडीएसोबत जाण्याच्या चर्चा सुरू झाल्या. या चर्चांवर शरद पवार यांनी स्पष्टपणे भूमिका मांडली. राजधानी दिल्लीत घडलेल्या दोन घटनांनी महाराष्ट्रातील राजकारणात पुन्हा विलिनीकरणाच्या चर्चे ला तोंड फुटले. याची चर्चा सुरु असतानाच शरद पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याची चर्चा देशभर सुरू आहे. दोन्ही राष्ट्रवादी खरंच एकत्र येणार आहेत


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. २९ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - ३०१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### विद्यार्थी आंदोलन ठरले राजकारणातील निर्णायक वळण?; मोदी सरकार सर्वाधिक असुरक्षित दिसल्याचा के. टी. रामाराव यांचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारत राष्ट्र समितीचे (बीआरएस) कार्याध्यक्ष के. टी. रामाराव यांनी देशभरातील विद्यार्थी आंदोलनाला भारतीय राजकारणातील निर्णायक वळण असे संबोधत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार गेल्या पंधरा दिवसांत कधी नव्हे इतके असुरक्षित दिसल्याचा दावा केला आहे.

रामाराव म्हणाले की, हे आंदोलन केवळ नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका गळतीपुरते मर्यादित नाही. शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी, तरुणांमधील वाढती निराशा आणि शासनाविषयीचा असंतोष यांना या आंदोलनातून अभिव्यक्ती मिळाली आहे. प्रश्नपत्रिका गळती ही केवळ या व्यापक असंतोषाला कारणीभूत ठरलेली ठिणगी असल्याचे त्यांनी म्हटले.

रामाराव यांनी केंद्र सरकारवर टीका करताना, पंतप्रधान मोदी आणि त्यांचे सरकार गेल्या दोन आठवड्यांत सर्वाधिक राजकीय दबावाखाली असल्याचे सांगितले. मात्र, सरकारकडे अजूनही तरुणांचा आणि जनतेचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी वेळ असल्याचेही त्यांनी नमूद केले.

याचबरोबर त्यांनी लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या प्रस्तावावरही भूमिका मांडली. संसदेत असा कायदा मांडला गेल्यास दक्षिणेकडील राज्यांचे लोकसभेतील विद्यमान प्रतिनिधित्व कायम राहील, याची हमी देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

विद्यार्थी आंदोलनातून केवळ सत्ताधाऱ्यांनीच नव्हे, तर विरोधी पक्षांनीही धडा घेण्याची गरज असल्याचे सांगत, जनतेतील असंतोष समजून घेऊन त्याला प्रभावी राजकीय पर्याय देण्यात अपयश आल्यास त्याचे परिणाम विरोधकांनाही भोगावे लागू शकतात, असा इशाराही रामाराव यांनी दिला.

# आधी आश्वासन, आता एफआयआर? सर्वोच्च न्यायालयाच्या अटींवर CJPचा आक्षेप;

## सरकारने दिलेला शब्द पाळावा, विद्यार्थी आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी कायम; सर्वोच्च न्यायालयाचे अल्पवयीन आंदोलकांच्या सुटकेचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

विद्यार्थी आंदोलकांवरील एफआयआरच्या तपासाला सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर 'कॉकरोच जनता पार्टी' (CJP)ने न्यायालयाच्या आदेशातील काही अटींवर आक्षेप नोंदवत केंद्र सरकारने चर्चेदरम्यान दिलेले आश्वासन पाळावे आणि आंदोलकांवरील सर्व गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी केली आहे.

सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांनी एएनआयशी बोलताना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले, मात्र आंदोलकांच्या मूळ मागण्या पूर्ण होणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगितले. आमची पहिली मागणी आंदोलकांवरील सर्व एफआयआर रद्द करणे आणि ताब्यातील सर्वांची सुटका करणे हीच होती. सरकारने चर्चेदरम्यान दिलेले आश्वासन आता प्रत्यक्षात उतरवावे, असे त्यांनी म्हटले.

दास यांनी दावा केला की, सरकारसोबत झालेल्या चर्चेत एफआयआर मागे घेण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात आधीच दाखल झालेले गुन्हे कायम राहतील, असे स्पष्ट करण्यात आल्याने दोन्ही भूमिकांमध्ये तफावत असल्याचा आरोप त्यांनी केला.

जर सरकारने दिलेला शब्द पाळला नाही, तर आम्ही पुन्हा रस्त्यावर उतरून आंदोलन करू, असा इशाराही त्यांनी दिला.

सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्देश



दरम्यान, या प्रकरणावरील सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना आंदोलकांविरुद्ध अनावश्यक कठोर कारवाई टाळण्याचे निर्देश दिले. तसेच, कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या १८ वर्षांखालील अल्पवयीन आंदोलकांची तात्काळ सुटका करण्याचे आदेश दिले.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणाचा निष्पक्ष आणि स्वतंत्र तपास होणे आवश्यक असल्याचे नमूद करत, चालू आंदोलनादरम्यान अटक किंवा ताब्यात घेतलेल्या आणि पूर्वी कोणताही गुन्हा नसलेल्या १८ वर्षांखालील सर्व मुलांना तातडीने मुक्त करण्यात यावे, असे स्पष्ट निर्देश दिले.

**आंदोलनाची पार्श्वभूमी**

२० जुलै रोजी दिल्लीत सीजेपीच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या 'चलो संसद' मोर्चादरम्यान आंदोलक आणि दिल्ली पोलीस तसेच आरएएफ जवानांमध्ये चकमक झाली होती. आंदोलकांना रोखण्यासाठी लाठीमार, अश्रुधूर आणि पेलेट गन्सचा वापर केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. या कारवाईनंतर विद्यार्थ्यांवरील एफआयआर, अटक आणि पोलिसी कारवाईचा मुद्दा देशभरात चर्चेचा विषय ठरला आहे.

## व्हायरल व्हिडिओवरून अधिकाऱ्याला दोषी ठरवू शकत नाही; 'संस्थांना बदनाम करणे थांबवा' - दिल्ली हायकोर्टाचे स्पष्ट शब्द

**महिला आंदोलकाला कानशिलात लगावल्याच्या आरोपानंतर एडीसीपी संदीप लांबा यांना चौकशीतून हटवण्याची मागणी फेटाळली; 'प्रत्येकाला निष्पक्ष सुनावणीचा अधिकार' असे न्यायालयाचे मत.**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

जंतरमंतरवरील आंदोलनादरम्यान एका महिला आंदोलकाला कथितपणे कानशिलात लगावल्याचा व्हायरल व्हिडिओ समोर आल्यानंतर अतिरिक्त पोलीस उपायुक्त (एडीसीपी) संदीप लांबा यांना एका अंतर्गत चौकशीच्या देखरेखीतून हटवण्याची मागणी अखेर दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. या सुनावणीत न्यायालयाने केवळ एका व्हायरल व्हिडिओच्या आधारे एखाद्या अधिकाऱ्याला दोषी ठरवणे किंवा संपूर्ण संस्थेवर अविश्वास व्यक्त करणे योग्य नसल्याचे स्पष्ट करत, न्यायालयीन आणि प्रशासकीय संस्थांची नाहक बदनामी थांबवा असा परखड संदेश दिला. न्यायमूर्ती गिरीश काठपालिया यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान नमूद केले की, सोशल मीडियावर व्हायरल झालेला व्हिडिओ हा अंतिम पुरावा ठरत नाही. प्रत्येक व्यक्तीला निष्पक्ष सुनावणी आणि न्याय्य प्रक्रियेचा अधिकार आहे. केवळ आरोपांच्या आधारे अधिकाऱ्याचे अधिकार काढून घेणे न्यायसंगत ठरणार नाही. २० जुलै २०२६ रोजी कॉकरोच जनता पार्टी (CJP) आयोजित 'चलो संसद' आंदोलनादरम्यान एडीसीपी संदीप लांबा यांनी एका महिला आंदोलकाला कानशिलात लगावल्याचा आरोप झाला होता. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आणि पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. दरम्यान, २०२५ मधील कथित बेकायदेशीर पोलीस कोठडी प्रकरणातील एका पीडितेने न्यायालयात याचिका दाखल करत, त्या प्रकरणाची अंतर्गत चौकशी लांबा यांच्या देखरेखीखाली सुरू असल्याने त्यांना चौकशीतून हटवावे, अशी मागणी केली होती. व्हायरल व्हिडिओमुळे त्यांच्या निष्पक्षतेवर संशय निर्माण झाल्याचा दावा याचिकाकर्त्याने केला होता.

**न्यायालयाचे परखड निरीक्षण**

याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, एका घटनेच्या आधारे संपूर्ण दिल्ली पोलिसांवर अविश्वास व्यक्त करणे योग्य नाही. अशा प्रकारे प्रत्येक अधिकाऱ्याला सोशल मीडियाच्या दबावाखाली दोषी ठरवण्याची पद्धत न्यायव्यवस्थेला मान्य असू शकत नाही.

## जिथे लाज वाटायला हवी होती, तिथे जल्लोष झाला! - प्रियंका गांधींचा सरकारवर संसदेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

परीक्षा घोटाळे, विद्यार्थ्यांच्या आंदोलनांवरील कारवाई आणि महाराष्ट्रातील एका विद्यार्थिनीच्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर लोकसभेत काँग्रेस खासदार झअ‌ॅळूरपझ्र ऋपवहळ तरवअ‌ॅर यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. 'परीक्षा सुधारणा विधेयका'वरील चर्चेदरम्यान त्यांनी सत्ताधारी पक्षावर नैतिक संवेदनशीलता हरवल्याचा आरोप करत, जिथे लाज वाटायला हवी होती, तिथे उत्सव साजरा केला जातोय, अशी तीव्र टीका केली.

प्रियंका गांधी म्हणाल्या की, एका बाजूला पेपरफुटीच्या घटनांनी त्रस्त झालेली तरुणाई नैराश्यात आहे, महाराष्ट्रात एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली असून तिचे कुटुंब शोकाकुल आहे; तर दुसऱ्या बाजूला माजी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर संसदेत 'जिंदाबाद'च्या घोषणा देत त्यांचे स्वागत केले जात आहे. हा कोणता अहंकार आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

त्यांनी सरकारला थेट प्रश्न विचारत म्हटले, या देशातील तरुणांची एवढी भीती का वाटते? विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला करून त्यांचा आवाज दाबण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?

शिक्षण व्यवस्थेवर टीका करत त्यांनी आरोप केला की, नीटसारख्या परीक्षांसाठी ग्रामीण भागातील कुटुंबे मुलांच्या शिक्षणासाठी दागिने विकतात, जमीन गहाण ठेवतात; मात्र सरकारी निष्काळजीपणामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. या देशात कष्टापेक्षा पैशालाच जास्त महत्त्व आहे,

## आरबीआयच्या तिजोरीत ८८०.५२ मेट्रिक टन सोने पण देशात नेमके किती? सरकारकडे उत्तरच नाही!

### संसदेत सरकारची कबुली; मंदिरे, मठ, ट्रस्ट आणि भारतीय कुटुंबांकडे असलेल्या सोन्याचा कोणताही अधिकृत अभ्यास नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष वृत्त**

देशाच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे (RBI) ८८०.५२ मेट्रिक टन सोन्याचा साठा आहे. मात्र, देशातील मंदिरे, धार्मिक संस्थांमध्ये आणि भारतीय कुटुंबांकडे एकूण किती सोने आहे, याची कोणतीही अधिकृत माहिती किंवा अभ्यास केंद्र सरकारकडे नसल्याची धक्कादायक बाब संसदेत उघड झाली आहे.

राज्यसभेत विचारण्यात आलेल्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी २६ जून २०२६ रोजीच्या आकडेवारीनुसार आरबीआयकडे ८८०.५२ मेट्रिक टन सोन्याचा साठा असल्याचे सांगितले. ३१ मार्च २०२५ रोजी हा साठा ८७९.५८ मेट्रिक टन, तर ३१ मार्च २०२४ रोजी ८२२.१० मेट्रिक टन होता.

मात्र, देशातील धार्मिक स्थळे आणि भारतीय कुटुंबांकडे किती सोने आहे, याचा कोणताही अधिकृत अभ्यास सरकारने केलेला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**सरकारला विचारावेसे वाटणारे प्रश्न**

✻ **देशातील सोन्याच्या साठ्याचा अंदाजच नसेल, तर राष्ट्रीय संपत्तीचे खरे मूल्यांकन कसे होणार?**

✻ लाखो कोटी रुपयांचे सोने मंदिरे, ट्रस्ट आणि घरांमध्ये असल्याचे वारंवार सांगितले जाते, मग त्याचा अधिकृत डेटा गोळा करण्याची गरज सरकारला का वाटली नाही?




✻ सोन्याच्या आयातीवर प्रचंड परकीय चलन खर्च होत असताना, देशांतर्गत उपलब्ध सोन्याचा वापर वाढवण्यासाठी ठोस धोरण कुठे आहे?

✻ 'गोल्ड मोनेटायझेशन स्कीम' आणि इतर योजना कितपत यशस्वी ठरल्या, जर सरकारकडे उपलब्ध सोन्याचाच अंदाज नसेल तर?

✻ आर्थिक नियोजन आणि धोरणे तयार करताना अंदाजांवर अवलंबून राहणे योग्य आहे का?

दरम्यान, मजबूत रुपया आणि जागतिक बाजारातील कमकुवत संकेतांमुळे मंगळवारी सराफा बाजारात सोन्याच्या दरात २,६४० प्रति १० ग्रॅम घसरण झाली. २४ कॅरेट सोन्याचा दर १,४७,००० प्रति १० ग्रॅमवर आला. चांदीतही ५,२०० प्रति किलोची घसरण होऊन दर २,२४,८०० प्रति किलोवर पोहोचला.

एचडीएफसी सिक्युरिटीजचे विश्लेषक सौमिल गांधी यांच्या मते, अमेरिकन फेड रिझर्व्हच्या पतधोरणाच्या घोषणेपूर्वी गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतल्याने सोन्यावर दबाव निर्माण झाला.

प्रश्न अजूनही कायम

आरबीआयच्या तिजोरीतील प्रत्येक ग्रॅम सोन्याचा हिशेब सरकारकडे आहे. मात्र, जगातील सर्वाधिक सोने बाळगणाऱ्या भारतीय समाजाकडे आणि धार्मिक संस्थांकडे नेमके किती सोने आहे, याचा अधिकृत अंदाजही सरकारकडे नाही. देशाच्या आर्थिक धोरणासाठी इतका महत्त्वाचा डेटा आजही उपलब्ध नसणे, हा केवळ माहितीचा अभाव आहे की धोरणात्मक दुर्लक्ष?

## "जे देवाची देणगी वाचवू शकले नाही, ते पेपरफुटी कशी थांबवणार?", अखिलेश यादवांचा सवाल, किरेन रिजिजूंनाही दिले उत्तर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

सोमवारी लोकसभेत मांडण्यात आलेल्या सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयकावर मंगळवारी (२८ जुलै) चर्चा झाली. या विधेयकावर बोलताना समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी केंद्र सरकारवर टीका केली. पेपरफुटी प्रकरणावर बोलताना अखिलेश यादव यांनी राम मंदिर देणगी चोरी प्रकरणावरून सरकारला लक्ष्य केले. जे देवाची देणगी वाचवू शकले नाहीत, ते पेपरफुटी कशी थांबवणार आहेत?, असा टोला त्यांनी लगावला.

अखिलेश यादव म्हणाले की, ''आपण मानले की, २० लाख मुलांनी परीक्षा दिली होती आणि एका कुटुंबात ५ लोक आहेत, तर हा आकडा एक कोटी लोकांचा होतो. आपण राजकीय लोक आहोत. आपल्याला माहिती आहे की, आंदोलन करताना किती तयारी करावी लागते. हे असे पहिले आंदोलन पाहिले, जिथे मुलांच्या आई-वडिलांनी सांगितले की, जा आणि आंदोलन करा. जर हे चुकीचे असेल, तर गृह मंत्र्यांना घेऊन या, ते सर्व स्पष्ट करतील.''

''जे लोक देवाचे दान वाचवू शकले नाहीत, ते पेपरफुटी कशी थांबवणार आहेत? देवाच्या गाभाऱ्यातून देणग्या गायब झाल्या. हे लोकांच्या डोळ्यात धूळ फेकत आहेत. २० परीक्षांचे पेपर लीक झाले. कोर्टात जावे लागले, त्यानंतर परीक्षा रद्द झाल्या'', अशी टीका अखिलेश यादव यांनी केली.

**'एनटीए'तील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यावर टीका**

अखिलेश यादव म्हणाले, ''आम्हाला आउटसोर्सिंगची भीती वाटते. असे होऊ नये की, पूर्ण सरकारच आउटसोर्स केले जाईल. हीच तुमचे उत्तरदायित्व आहे का, की सर्वात महत्त्वाच्या संस्थेत तुम्ही अधिकारी आउटसोर्स केले आहे? छद्धअ मध्ये सगळे कर्मचारी आउटसोर्स केले आहेत. छद्धअ मध्ये बसून घोटाळा करणारे ते कोण लोक होते, हे आम्हाला समजले पाहिजे'', असा सवाल अखिलेश यादव यांनी केला.

**रिजिजू यांनी आणीबाणीवरुन डिवचले; अखिलेश म्हणाले, 'आताही बदल होईल'**

अखिलेश यादव म्हणाले की, ''सरकारने विचार केला पाहिजे की, हे तरुण आपल्यासाठी संकट बनू नयेत. शिक्षण चांगले असेल तर प्रगतीही नक्की होईल. जे विधेयक तुम्ही घेऊन आला आहात, तसे विधेयक तर २०२४ मध्येही आणले होते. तरीही पेपर का फुटला? तुम्हाला विधेयक का आणावे लागले, हे तुम्ही सांगा.''

यावर केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी डिवचले आणि म्हणाले की, ''तुम्ही हे सांगा की, आंदोलनानंतर विधेयक आणणे चांगले की आंदोलन चिरडण्यासाठी आणीबाणी लादणे चांगले?''

अखिलेश यादव म्हणाले की, ''आम्ही आणीबाणी पाहिली नाही, पण आता दिल्लीत पाहिले की ती कशी होती. अश्रूधुराचे गोळे आणि लाकडावर खिळ्यासारखे काहीतरी लावले होते. त्यात विद्युत प्रवाही सोडण्यात आला होता. दिल्लीत जे झाले, तेसुद्धा आणीबाणीपेक्षा कमी नव्हते. जर यांना आणीबाणी आठवली आहे, तर आणीबाणीनंतरही बदल झाला होता आणि या वेळीही बदल होईल. देणगी चोरी झाली आहे, गुप्तदानही चोरीला गेले आहे. देवसुद्धा तुम्हाला माफ करणार नाही'', असे उत्तर अखिलेश यादव यांनी दिले.

**''शिक्षणापासून नोकरीपर्यंत सर्व गोष्टींवर हल्ला''**

अखिलेश यादव म्हणाले की, ''सरकारने सर्वात आधी प्राथमिक शाळांवर हल्ला केला. कितीतरी प्राथमिक शाळा बंद केल्या. तरुणांच्या भविष्यावर तुम्ही घाला घातला आहे. नोकऱ्यांवर हल्ला केला आहे. असे यासाठी केले, जेणेकरून पायावरच हल्ला झाला तर गरीब कुटुंबातील मुले पुढे जाऊ शकणार नाहीत.''

## संपादकीय

### भांडवलाचे स्वागत, पण विश्वासही तितकाच महत्त्वाचा!

भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) परकीय गुंतवणुकीच्या (FDI) नियमांमध्ये व्यापक बदल सुचवले आहेत. गेल्या अनेक वर्षांत वारंवार झालेले दुरुस्ती आदेश, स्पष्टीकरणे आणि गुंतागुंतीच्या अटींमुळे FDI चे नियम अवघड बनले होते. आता त्याऐवजी अधिक सुसंगत, तत्त्वाधारित आणि स्पष्ट नियमावली आणण्याचा प्रयत्न होत आहे. हा बदल स्वागतार्ह असला, तरी केवळ नियम सोपे केल्याने परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढेल, अशी अपेक्षा ठेवणे वास्तववादी ठरणार नाही.

आज भारताकडे जगभरातील गुंतवणूकदारांचे लक्ष आहे. मोठी बाजारपेठ, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि उत्पादन क्षेत्रातील संधी यामुळे भारत आकर्षणाचे केंद्र बनला आहे. मात्र, प्रत्यक्षात भारतात येणाऱ्या निव्वळ FDI मध्ये अपेक्षित वाढ दिसत नाही. कारण जितकी नवीन गुंतवणूक येते, तितक्याच प्रमाणात जुनी गुंतवणूक बाहेरही जात आहे. त्यामुळे भारतासमोरील खरे आव्हान नवीन गुंतवणूक आणण्याइतकेच विद्यमान गुंतवणूकदारांना टिकवून ठेवण्याचे आहे.

RBI चे प्रस्तावित नियम व्यवहारातील अनेक संदिग्धता दूर करू शकतात. परकीय गुंतवणूक, पोर्टफोलिओ गुंतवणूक, मालकी हक्क, नियंत्रण, डाउनस्ट्रीम गुंतवणूक यांसारख्या संकल्पनांची स्पष्ट व्याख्या झाल्यास व्यवहार अधिक सुलभ होतील. तसेच विलीनीकरण, अधिग्रहण, पुनर्रचना आणि एक्झिट प्रक्रियेलाही गती मिळू शकते.

परंतु गुंतवणूकदार केवळ नियमांकडे पाहून निर्णय घेत नाहीत. त्यांच्यासाठी धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी, कर प्रणालीतील स्थिरता, करारांची प्रभावी अंमलबजावणी, परवानग्यांची जलद प्रक्रिया आणि न्यायव्यवस्थेची विश्वासार्हता तितकीच महत्त्वाची असते. नियम वारंवार बदलणे किंवा विविध सरकारी संस्थांकडून वेगवेगळे अर्थ लावले जाणे, हे गुंतवणूकदारांचा विश्वास कमी करणारे ठरते.

परकीय गुंतवणुकीतून काही भांडवल बाहेर जाणे हे नकारात्मकच आहे, असे मानणेही योग्य नाही. परिपक्व गुंतवणूकदार नफा कमावून बाहेर पडतात आणि त्यातून नवीन गुंतवणुकीसाठी जागा निर्माण होते. मात्र, बाहेर जाणाऱ्या भांडवलाच्या तुलनेत नवीन गुंतवणूक कमी होत असेल, तर ती चिंतेची बाब ठरते.

भारताला विशेषतः उत्पादन, पायाभूत सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात ग्रीनफिल्ड FDI ची गरज आहे. अशा गुंतवणुकीतून नवीन उद्योग उभे राहतात, रोजगार निर्माण होतो, निर्यात वाढते आणि उत्पादकतेलाही चालना मिळते. केवळ आर्थिक व्यवहार किंवा कंपन्यांच्या खरेदी-विक्रीपुरती गुंतवणूक दीर्घकालीन विकासासाठी पुरेशी ठरत नाही.

त्यामुळे ठइख चे नियम सुलभ करण्याचे पाऊल योग्य दिशेने टाकलेले असले, तरी ते अंतिम उपाय नाही. केंद्र सरकारची FDI धोरणे, RBI चे नियम आणि विविध नियामक संस्थांची अंमलबजावणी यामध्ये सुसंगती आवश्यक आहे. धोरणात्मक स्थैर्य, पारदर्शकता आणि गुंतवणूकदारांचा विश्वास यांची जोड मिळाल्यासच भारताला दीर्घकालीन आणि शाश्वत परकीय गुंतवणूक आकर्षित करता येईल.

सारांश असा की, नियमांची सुलभता ही गुंतवणुकीची दारे उघडते; पण त्या दारातून भांडवल आत येण्यासाठी विश्वास, स्थिर धोरणे आणि पारदर्शक प्रशासन हीच खरी गुरुकिल्ली आहे.

# डिंभे धरण ९१.५३ टक्के भरले; आंबेगाव, जुन्नर, शिरूर आणि श्रीगोंदा तालुक्यातील बळीराजा सुखावला

## पावसामुळे जलसाठ्यात मोठी वाढ; खरीप हंगामाला मिळणार दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील हुतात्मा बाबू गेनू जलाशय (डिंभे धरण) सध्या ९१.५३ टक्के भरले असून, धरणातील वाढलेल्या जलसाठ्यामुळे आंबेगाव, जुन्नर, शिरूर आणि श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. समाधानकारक पावसामुळे धरणाच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाल्याने खरीप हंगामासह आगामी रब्बी पिकांसाठीही आशादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.

डिंभे धरणातील वाढलेल्या पाणीसाठ्यामुळे सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध होण्याची शक्यता असून, ऊस, भाजीपाला, डाळिंब, कांदा आणि इतर नगदी पिकांसाठी याचा मोठा फायदा होणार आहे. तसेच भूजल पातळीतही वाढ होण्यास मदत होणार असल्याने विहिरी आणि बोअरवेलधारक शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे.



गेल्या काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळे डिंभे धरण लवकरच पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

धरणातील समाधानकारक जलसाठ्यामुळे चारही तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, यंदाचा खरीप हंगाम चांगला जाईल, अशी आशा बळीराजाने व्यक्त केली आहे.

# पिंपरी-चिंचवडच्या वाहतूक कोंडीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उच्चस्तरीय बैठक

## एचसीएमटीआर, ई-आरटीएस आणि सर्क्युलर रोड प्रकल्पांना गती; पायलट प्रकल्प तातडीने सुरू करण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांतील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीत शहराच्या भविष्यातील वाहतूक गरजा लक्षात घेऊन हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रूट (HCMTR), इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम (E-RTS) तसेच सर्क्युलर रोड डेव्हलपमेंट प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश देण्यात आले.

मुख्यमंत्र्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेला प्रकल्पासाठी आवश्यक प्रशासकीय, तांत्रिक आणि





नियोजनाशी संबंधित प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यास सांगितले.

तसेच सर्क्युलर रोड प्रकल्पाचा पायलट टप्पा निश्चित वेळेत सुरू करून नागरिकांना आधुनिक, पर्यावरणपूरक आणि कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

बैठकीत शहरातील वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाढत्या वाहनसंख्येमुळे निर्माण झालेल्या वाहतूक समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन बहुआयामी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रस्तावित प्रकल्पांमुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास, प्रवासाचा वेळ व इंधन खर्च घटण्यास तसेच प्रदूषण नियंत्रणास मोठी मदत होईल, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये कचऱ्याचा साठा; उत्पादनासाठीचा कच्चा माल की नियमभंग?

## अभय भोर यांचा गंभीर सवाल; संबंधित विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी ।**

एमआयडीसी परिसरातील काही कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचा साठा करून ठेवला जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. हा साठा प्रत्यक्षात उत्पादन प्रक्रियेसाठी आवश्यक असलेला कच्चा माल आहे की नियमबाह्य पद्धतीने साठवलेला औद्योगिक कचरा, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते अभय भोर यांनी उपस्थित केला आहे.

कंपन्यांच्या आवारात प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरून ठेवलेल्या कचऱ्याचे छायाचित्रे समोर आल्यानंतर या प्रकरणाची सखोल चौकशी



करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. औद्योगिक कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावता तो कंपनी परिसरातच साठवून ठेवला जात असल्यास पर्यावरणासह कामगारांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती व्यक्त होत आहे.

अभय भोर यांनी संबंधित प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमआयडीसी प्रशासन आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने संयुक्त पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी केली आहे. जर हा साठा कच्चा माल असल्याचा दावा कंपन्यांकडून केला जात असेल, तर त्यासंबंधीची अधिकृत कागदपत्रे आणि परवानग्या सार्वजनिक कराव्यात, असेही त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणामुळे औद्योगिक क्षेत्रातील कचरा व्यवस्थापन, पर्यावरणीय नियमांचे पालन आणि प्रशासनाच्या देखरेखीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित विभाग आता काय भूमिका घेतो याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे

# 'शून्य कचरा' उपक्रमातील उल्लेखनीय कार्यासाठी श्रीकृष्ण महिला बचत गटाला 'नॅशनल प्राईड ऑफ इंडिया' पुरस्कार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या 'शून्य कचरा (झिरो वेस्ट स्लम)' उपक्रमात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल श्रीकृष्ण महिला बचत गटाला प्रतिष्ठेचा 'नॅशनल प्राईड ऑफ इंडिया' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आसरा सोशल फाऊंडेशन, पुणे आणि ओम पब्लिकेशन, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील पत्रकार भवन येथे आयोजित 'उत्कर्ष भारत सन्मान सोहळा-२०२६' मध्ये अभिनेते विजय गोखले आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते बचत गटाला मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. बचत गटाच्या अध्यक्षा मंगल वाडकर आणि अश्विनी चौधरी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



पिंपरी-चिंचवड महापालिकेने झोपडपट्टी भागात स्वच्छता, कचऱ्याचे स्रोतावर वर्गीकरण, ओला व सुका कचरा स्वतंत्र संकलन, पुनर्वापर आणि पुनर्चक्रणाला चालना देण्यासाठी १६ ऑगस्ट २०२२ रोजी 'शून्य कचरा झोपडपट्टी' प्रकल्प सुरू केला. देशातील पहिला झिरो वेस्ट स्लम प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या उपक्रमात स्थानिक महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग असून, त्यांच्या माध्यमातून घराघरांत जनजागृती, कचरा वर्गीकरण, संकलन आणि परिसर स्वच्छतेची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.

या प्रकल्पाची सुरुवात गवळीमाथा झोपडपट्टी परिसरातून झाली. येथे श्रीकृष्ण महिला बचत गटाने सातत्यपूर्ण प्रयत्नांद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण केली. घराघरांत जाऊन कचरा वर्गीकरणाचे महत्त्व पटवून देणे, नियमित कचरा संकलन, परिसर स्वच्छ ठेवणे आणि नागरिकांचा सहभाग वाढविणे या कामांमध्ये गटाने उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला असून इतर झोपडपट्टी भागांसाठीही तो प्रेरणादायी ठरला आहे.

महिला सक्षमीकरण, पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छतेच्या क्षेत्रात प्रभावी कामगिरी केल्याबद्दल श्रीकृष्ण महिला बचत गटाला राष्ट्रीय स्तरावरील हा सन्मान प्रदान करण्यात आला असून, महापालिकेच्या 'शून्य कचरा' उपक्रमालाही यामुळे नवी ओळख मिळाली आहे.

# पवना धरण १००% भरले, तरी १५% पाणी कपात; निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पवना धरण शंभर टक्के भरलेले असतानाही पिंपरी-चिंचवड शहरासाठी लागू करण्यात आलेली १५ टक्के पाणी कपात तात्काळ रद्द करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास तानाजी बिरादार यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

बिरादार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पवना धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असून शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत नागरिकांवर पाणी कपातीचा बोजा टाकणे अन्यायकारक आहे. पाणीटंचाईची कोणतीही वास्तविक परिस्थिती नसताना कपातीचा निर्णय कायम ठेवण्यामागील कारणे प्रशासनाने स्पष्ट करावीत, अशीही त्यांनी मागणी केली.

त्यांच्या मते, सध्या पावसाचे प्रमाण समाधानकारक असून धरणातील पाणीसाठाही मुबलक आहे. त्यामुळे नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा करणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. पाणी कपातीमुळे नागरिक, गृहनिर्माण संस्था तसेच व्यापारी आस्थापनांना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

महापालिका प्रशासनाने वस्तुस्थितीचा आढावा घेऊन १५ टक्के पाणी कपातीचा निर्णय तातडीने मागे घ्यावा आणि पूर्ववत पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी बिरादार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# ८ ऑगस्टपर्यंत गणना अर्ज भरा; मतदार यादीत नाव निश्चित करा


## पिंपरी-चिंचवड महापालिकेचे पात्र नागरिकांना आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड (विशेष प्रतिनिधी)**

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर)-२०२६ अंतर्गत पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र नागरिकांनी ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत गणना अर्ज भरून संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने केले आहे.

वेळेत गणना अर्ज सादर करणाऱ्या पात्र नागरिकांची नावे १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट केली जाणार आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या निर्दे




शानुसार राज्यभर विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून, या मोहिमेअंतर्गत बीएलओ घरभेटी देऊन गणना अर्जांचे वितरण व संकलन करत आहेत.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले की, लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वांनी गणना अर्ज वेळेत भरून बीएलओकडे जमा करावा. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नावाची खात्री करून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दावे किंवा हरकती दाखल कराव्यात, असेही त्यांनी आवाहन केले.

अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनीही नागरिकांनी बीएलओंना सहकार्य करून गणना अर्ज वेळेत सादर करावेत, असे आवाहन केले. ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या पात्र नागरिकांची नावे यादीत नसतील किंवा नव्याने मतदार नोंदणी करावयाची असेल, त्यांना १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नमुना क्रमांक ६ भरून अर्ज करता येणार आहे. त्यामुळे कोणताही पात्र नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# इंद्राजीनगर क्रीडा संकुलावरील अतिक्रमणाचा मुद्दा महासभेत गाजला; तातडीने कारवाईची मागणी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रभाग क्रमांक ८ मधील इंद्राजीनगर येथील क्रीडा संकुल, बॅडमिंटन हॉल आणि क्रीडा मैदानावरील वाढत्या अतिक्रमणाचा मुद्दा चर्चेचा विषय ठरला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक तुषार सहाने यांनी हा प्रश्न उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले. क्रीडा संकुलाभोवती वाढणाऱ्या अतिक्रमणामुळे भविष्यात मुलांना आणि खेळाडूंना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध राहणार नाही, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

महापालिकेने तातडीने अतिक्रमण हटवून क्रीडा संकुल आणि मैदानाचे संरक्षण करण्यासाठी कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी त्यांनी सभागृहात केली. तसेच सार्वजनिक क्रीडा सुविधा सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान’ समाधान शिबिरात ८१६ लाभार्थ्यांना थेट लाभ

## मंचर येथे विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली; आमदार दिलीप वळसे पाटील यांचे मार्गदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर : प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभाग, जिल्हा प्रशासन तसेच आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघातील विविध शासकीय यंत्रणांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान’ अंतर्गत विधानसभा मतदारसंघस्तरीय भव्य समाधान शिबिर सोमवारी (दि. २७ जुलै) मंचर येथील शिवगिरी मंगल कार्यालयात उत्साहात पार पडले. या शिबिरात आंबेगाव व शिरूर तालुक्यातील ८१६ लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ, दाखले आणि प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.



शिबिराचे उद्घाटन आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आंबेगाव व शिरूरचे उपविभागीय अधिकारी, दोन्ही तालुक्यांचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, खेड उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, तालुका बालविकास अधिकारी, आदिवासी विकास विभागाचे अधिकारी तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार दिलीप वळसे पाटील म्हणाले, शासकीय योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत जलद गतीने आणि एकाच छताखाली पोहोचविणे हा या समाधान शिबिराचा मुख्य उद्देश आहे. प्रशासनाने सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांच्या अडचणी तत्परतेने सोडवून त्यांना शासकीय सेवांचा थेट लाभ मिळवून द्यावा.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या महसूल अभियानांतर्गत आंबेगाव तालुक्यातील ९,७१८ आणि शिरूर तालुक्यातील ५,१५० नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला होता. या अभियानाच्या पुढील टप्प्यात आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिरात दोन्ही तालुक्यांतील ८१६ लाभार्थ्यांना विविध शासकीय सेवांचा लाभ मिळाला.

शिबिरात महसूल, आरोग्य, कृषी, महिला व बालविकास, पंचायत राज, आदिवासी विकास, निवडणूक, महा ई-सेवा आणि सार्वजनिक बांधकाम विभागांसह विविध विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आले होते. नागरिकांच्या विविध समस्या, दाखले, प्रमाणपत्रे आणि शासकीय योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय कार्यालयांचे वारंवार हेलपाटे टाळून एकाच ठिकाणी विविध सेवांचा लाभ मिळाल्याने शासनाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

* विभागनिहाय लाभार्थी संख्या
* आंबेगाव पंचायत समिती – २७१
* शिरूर पंचायत समिती – ७५
* आरोग्य विभाग – १८२
* महसूल, निवडणूक व संजय गांधी निराधार योजना – १२५
* कृषी विभाग – ५६
* महा ई-सेवा केंद्र – ३९
* महिला व बालविकास विभाग – २८
* आदिवासी विकास विभाग (घोडेगाव प्रकल्प कार्यालय) – १५
* सार्वजनिक बांधकाम विभाग – ८
* भूमी अभिलेख विभाग – ३
* इतर विभाग – ११

## सारांश वृत्त

### वडगावपीर येथे कारगिल विजय दिन देशभक्तीच्या उत्साहात साजरा;

#### माजी सैनिकांचा सन्मान, प्रभात फेरी, वृक्षारोपण व जवानांसाठी राखी संकलन उपक्रम



■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : आंबेगाव तालुक्यातील वडगावपीर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, प्रगती विद्यालय तसेच माजी सैनिक योद्धा सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने कारगिल विजय दिन देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त माजी सैनिक आणि शालेय विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून देशभक्तीपर घोषणा देत शहीद जवानांना अभिवादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक भगवंत टाव्हरे यांनी केले. प्रारंभी कारगिल युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सैनिक योद्धा सेवाभावी संघ, महाराष्ट्र राज्याचे ऑन. कॅप्टन साहेबराव तलवंडीकर होते.

यावेळी माजी सैनिक योद्धा संघाचे सचिव बाळासाहेब नवले, कार्याध्यक्ष रामदास पालेकर पाटील, बापूसाहेब निलक, डी. पी. कान्हुरकर, तुळशीराम आदक, अण्णासाहेब पोखरकर, गोरक्ष आदक पाटील, रमेश रोकडे, बळवंत राजगुडे, छाया गुळवे, सुवर्णा राजगुडे यांच्यासह पुणे जिल्ह्यातील अनेक माजी सैनिक, वीरनारी, वीरमाता-पिता, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बाळासाहेब नवले, दीपक पायगुडे आणि तुकाराम डफळ या माजी सैनिकांनी कारगिल युद्धातील अनुभव आणि शौर्यकथा उपस्थितांसमोर मांडल्या. तर रामदास पालेकर पाटील यांनी कारगिल युद्धाचा संपूर्ण इतिहास आणि युद्धातील घडामोडींचा आढावा घेत विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची प्रेरणा जागवली.

यावेळी सीमेवरील जवानांसाठी राखी संकलन, वृक्षारोपण तसेच विद्यार्थ्यांना भारतीय सैन्यात भरती होण्यासाठी मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

# दुचाकीस्वारावर बिबट्याचा हल्ला; पशुवैद्यकीय अधिकारी

## अवसरी बुद्रुकच्या चौरे-येलभरमळा परिसरात दहशत; पिंजरा लावण्याची ग्रामस्थांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर । प्रतिनिधी :

आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक येथील चौरे-येलभरमळा परिसरात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास बिबट्याने दुचाकीवरून जात असलेल्या पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश टाव्हरे यांच्या दुचाकीवर अचानक झडप घातली. मात्र, प्रसंगावधान राखत त्यांनी वाहनाचा ताबा न सोडल्याने ते सुदैवाने कोणत्याही दुखापतीशिवाय बचावले.

घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. चौरे मळ्यातील हाडवळा वस्ती परिसरात नितीन शिंदे यांच्या उसाच्या शेतात बिबट्या असल्याचे पुन्हा निदर्शनास आले. याबाबतची माहिती मिळताच वनरक्षक गोकुळ गवळी यांना कळविण्यात आली. त्यांनी तातडीने वन विभागाचे गस्ती पथक घटनास्थळी पाठवून शोधमोहीम सुरू केली.

शोधमोहीमेदरम्यान ग्रामपंचायत सदस्य कल्याण हिंगे, रामहरी चौरे यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या उपस्थितीत बिबट्या उसाच्या शेतात शिरताना दिसून आला. या भागात मादी बिबट्यासोबत पिल्लेही असण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाणे तसेच रस्त्याने प्रवास करणे धोकादायक बनल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, वन विभागाची गस्त सुरू असतानाच प्रणव चौरे यांच्या वाहनामागेही बिबट्या काही अंतरापर्यंत आल्याची घटना घडली. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण अधिक गडद झाले असून नागरिकांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. ग्रामपंचायत सदस्य कल्याण हिंगे यांनी वन विभागाकडे या परिसरात तात्काळ पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचीही मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.


वन विभागाने नागरिकांना रात्रीच्या वेळी एकट्याने शेतात किंवा उसाच्या परिसरात जाणे टाळावे, लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवावे तसेच बिबट्याचा वावर आढळल्यास तात्काळ वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# महाळुंगे पडवळ येथे बिबट मादी जेरबंद; ग्रामस्थांनी घेतला सुटकेचा श्वास

## पिंगळदर मळा परिसरात लावलेल्या पिंजऱ्यात अडकली सुमारे वर्षभराची बिबट मादी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर । प्रतिनिधी :

आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ येथील पिंगळदर मळा परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याच्या मुक्त संचारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर वन विभागाने नारायण मंजाबा चासकर व दत्तात्रय नारायण चासकर यांच्या शेत परिसरात पिंजरा लावला होता. अखेर मंगळवारी पहाटे सुमारे एक वर्षाची बिबट मादी या पिंजऱ्यात जेरबंद झाल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा श्वास घेतला.



बिबट मादी पिंजऱ्यात अडकल्याची माहिती मिळताच वनपरीक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी तातडीने दखल घेत वन विभागाचे कर्मचारी आणि रेस्क्यू पथक घटनास्थळी रवाना केले. या मोहिमेत बापू वाघ, हर्षल गावडे, प्रकाश हिले, दिपक भोंडवे तसेच वनसेवक काळुराम गायकवाड यांनी सहभाग घेत बिबट मादीला सुरक्षितपणे ताब्यात घेतले.

त्यानंतर बिबट मादीला पुढील वैद्यकीय तपासणीसाठी अवसरी वन उद्यानात हलविण्यात आले आहे. तिच्या आरोग्याची तपासणी पूर्ण झाल्यानंतर वन्यजीव संरक्षण नियमांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती वन विभागाने दिली.

गेल्या काही दिवसांपासून पिंगळदर मळा परिसरात बिबट्याचा वारंवार वावर आढळत असल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट मादी जेरबंद झाल्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत वन विभागाच्या कारवाईचे स्वागत केले.

दरम्यान, वन विभागाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे, वन्यप्राण्यांचा वावर दिसून आल्यास तात्काळ वन विभागाला माहिती देण्याचे तसेच बिबट्याजवळ जाण्याचा किंवा त्याला कोणत्याही प्रकारे त्रास देण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन केले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त श्रीकृष्ण पतसंस्थेच्या पाचही शाखांमध्ये फराळ वाटप

## सभासद, ग्राहक व भाविकांसाठी सामाजिक उपक्रम; विश्वासाची परंपरा जपणाऱ्या संस्थेचा अनोखा उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्रीकृष्ण पतसंस्थेच्या वतीने मुख्य कार्यालयासह संस्थेच्या पाचही शाखांमध्ये सभासद, ग्राहक आणि नागरिकांना फराळाचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



यावेळी श्रीकृष्ण पतसंस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब रामकृष्ण पिंगळे, उपाध्यक्ष राजेंद्र बळवंत भैय्ये, सर्व संचालक, शाखांचे सल्लागार, कर्मचारीवृंद तसेच नारायणगावचे माजी सरपंच बाबू पाटे यांच्या हस्ते दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. विविध गावांतील सरपंच, उपसरपंच तसेच अनेक संस्थांचे अधिकारी व पदाधिकारीही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

श्रीकृष्ण पतसंस्थेची स्थापना सन १९९७-९८ मध्ये वडगाव काशिंबेग येथे ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाच्या उद्देशाने करण्यात आली. गावाचा सर्वांगीण विकास साधणे, स्थानिकांना आर्थिक बळ देणे आणि बेरोजगारी कमी करण्याच्या ध्येयातून सुरू झालेल्या या संस्थेने गेल्या तीन दशकांत विश्वासार्ह आर्थिक संस्था म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आर्थिक व्यवहारांसोबतच सामाजिक बांधिलकी जपत श्रीकृष्ण पतसंस्था धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवत असते. आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेला फराळ वाटपाचा उपक्रमही त्याच सामाजिक दायित्वाचा एक भाग असल्याचे यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. उपस्थितांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक करत, समाजाशी असलेली नाळ जपणाऱ्या अशा उपक्रमांमुळे सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याची भावना व्यक्त केली.

# खडकवाडी–पोंदेवाडी घाटात रस्त्यावर झाडांच्या फांद्यांचे अतिक्रमण; अपघाताचा धोका वाढला

## वन विभागाने तातडीने रस्ता मोकळा करण्याची ग्रामस्थ, विद्यार्थी व वाहनचालकांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी :

आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी–पोंदेवाडी या दोन गावांना जोडणाऱ्या घाटरस्त्यावर झाडांच्या फांद्या व दाट झुडपांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वळणदार घाटरस्त्यावर समोरून येणारी वाहने दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला असून, वन विभागाने तातडीने झाडांच्या फांद्यांची छाटणी करून रस्ता मोकळा करावा, अशी मागणी ग्रामस्थ, विद्यार्थी आणि वाहनचालकांनी केली आहे.




दोन दिवसांपूर्वी याच घाटात एका मारुती कार आणि मोटारसायकलचा अपघात थोडक्यात टळला. या घटनेनंतर रस्त्यावरील धोकादायक झाडांच्या फांद्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

याच कारणामुळे पोंदेवाडीमार्गे धावणारी शिरूर–डिंभा एसटी बस सध्या या मार्गाऐवजी बेल्हा–जेजुरी मार्गे रोडवाडी फाटा मार्गे वळविण्यात आली असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. खडकवाडी आणि पोंदेवाडीदरम्यान वन विभागाच्या हद्दीतील दाट झाडीमुळे रस्त्यावर दृश्यमानता कमी होत असून, समोरून येणारी वाहने वेळेत दिसत नसल्याने हा मार्ग धोकादायक बनला आहे. वारंवार तक्रारी करूनही झाडांच्या फांद्यांची छाटणी केली जात नसल्याने अपघाताचे प्रमाण वाढत असल्याची खंत उपसरपंच एकनाथ सुक्रे यांनी व्यक्त केली.दरम्यान, या परिसरात बिबट्याचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याने नागरिकांमध्ये आधीच भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे वन विभागाने रस्त्यालगतची झाडे-झुडपे तातडीने हटवून वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेची खबरदारी घ्यावी, अशी मागणी माजी सरपंच अनिल डोके यांनी केली आहे.

या मार्गावरून दत्तात्रय गोविंद वळसे पाटील महाविद्यालय, पारगाव तसेच भीमाशंकर सहकारी साखर कारखाना येथे जाणारे विद्यार्थी, शेतकरी आणि नागरिक मोठ्या प्रमाणावर प्रवास करतात. रस्त्यावर आलेल्या झाडांच्या फांद्यांमुळे त्यांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याने वन विभागाने तातडीने रस्ता पूर्णपणे मोकळा करून सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# देवगावच्या संभाजी भोसले यांना ‘आदर्श शेतकरी पुरस्कार’

## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शेतकरी मेळाव्यात झाला गौरव; कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील देवगाव येथील प्रगतशील शेतकरी संभाजी मल्हारी भोसले यांना पुणे येथील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात सपत्नीक ‘आदर्श शेतकरी पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले. कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण प्रयोग, विक्रमी उत्पादन आणि इतर शेतकऱ्यांना दिलेल्या मार्गदर्शनाची दखल घेत त्यांची या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.



पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने आयोजित या मेळाव्यात ‘अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजना’ तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित कृषी उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. याच कार्यक्रमात पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एका आदर्श शेतकऱ्याचा सन्मान करण्यात आला.

आंबेगाव तालुक्याचे प्रतिनिधित्व करणारे संभाजी भोसले यांनी शेवगा, पेरू, डाळिंब, कांदा, भाजीपाला आणि ऊस या पिकांमध्ये उत्कृष्ट उत्पादन घेत आदर्श शेतीचा नमुना उभा केला आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करण्याबरोबरच ते इतर शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन मार्गदर्शन करून ज्ञानाची देवाणघेवाण करत असल्याने त्यांची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली.

हा पुरस्कार उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषीमंत्री दत्तात्रेय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष ॲड. प्रदीप वळसे पाटील, डॉ. संजय कोलते, मनोज तांबे तसेच देवगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### भारतीय बाजारात कोका-कोलाला मोठा धक्का; बाजारातील हिस्सा घसरला, वाढत्या किमतींचा ग्राहकांवर परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारतातील शीतपेय बाजारात कोका-कोलाला दुसऱ्या तिमाहीत मोठा फटका बसला असून, कंपनीचा बाजारातील हिस्सा घटल्याची कबुली कंपनीचे मुख्य वित्त अधिकारी जॉन मर्फी यांनी दिली आहे. वाढते उत्पादन खर्च, विशेषतः ॲल्युमिनियमच्या किमतीतील वाढ आणि पॅकेजिंगमधील अडचणी यामुळे कंपनीला भारतात आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

अमेरिका-इस्रायल आणि इराण संघर्षानंतर ॲल्युमिनियम कॅनच्या पुरवठ्यावर परिणाम झाला. त्यामुळे भारतात डाएट कोकच्या उपलब्धतेवर मर्यादा आल्या. त्यानंतर वाढलेल्या मागणीमुळे कंपनीने भारतातील विविध उत्पादनांच्या किमती वाढवल्या असून, मोठ्या आकाराचे कॅन आग्नेय आशियातील देशांतून मागविण्याची वेळ कंपनीवर आली आहे.

कोका-कोलाने जागतिक स्तरावर मजबूत तिमाही आर्थिक निकाल जाहीर करत वार्षिक अंदाजही वाढवले असले, तरी भारतातील घसरलेला बाजारातील हिस्सा आशिया-पॅसिफिक विभागाच्या कामगिरीवर परिणाम करणारा ठरला आहे.

भारतातील ग्राहकांसाठी याचा थेट परिणाम म्हणजे शीतपेयांच्या वाढलेल्या किमती, काही उत्पादनांचा मर्यादित पुरवठा आणि बाजारातील स्पर्धा अधिक तीव्र होण्याची शक्यता. तज्ज्ञांच्या मते, भारतीय ग्राहक अधिक किफायतशीर पर्यायांकडे वळल्यास बहुराष्ट्रीय कंपन्यांसमोर पुढील काळात आणखी मोठे आव्हान उभे राहू शकते.

# ‘ई-फायलिंगमुळे न्यायालयाचे दरवाजे २४ तास खुले’; ऑफ-आवर्स सुनावणीसाठी स्वतंत्र यंत्रणेची मागणी सर्वोच्च न्यायालयाकडून फेटाळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नियमित न्यायालयीन कामकाजाच्या वेळेनंतर जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याशी संबंधित प्रकरणांची तातडीने सुनावणी करण्यासाठी स्वतंत्र २४ तासांची यंत्रणा किंवा मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. ई-फायलिंग आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या विद्यमान सुविधांमुळे न्यायालयाचे दरवाजे कोणत्याही वेळी ठोठावता येतात आणि तातडीच्या प्रकरणांसाठी आधीपासूनच प्रभावी प्रशासकीय व्यवस्था अस्तित्वात असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ‘माहेरविश रेइन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया’ प्रकरणाची सुनावणी करताना सांगितले की, नियमित न्यायालयीन वेळ आणि कार्यालयीन वेळेनंतरचा प्रवेश यामध्ये मूलभूत फरक आहे. न्यायालयीन कामकाजाच्या वेळेनंतरही याचिका दाखल करता येते, मात्र प्रत्येक प्रकरणातील तातडीचे स्वरूप स्वतंत्रपणे तपासले जाते.

खंडपीठाने नमूद केले की, ई-फायलिंग सुविधा २४ तास उपलब्ध असल्यामुळे न्यायालय पूर्णपणे बंद असल्याचा दावा ग्राह्य धरता येत नाही. तांत्रिक सुविधांमुळे पक्षकारांना कोणत्याही वेळी याचिका दाखल करण्याची मुभा आहे. सर्वोच्च न्यायालयाने २९ नोव्हेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाचा उल्लेख करत सांगितले की, जीवन आणि स्वातंत्र्याशी संबंधित अतिमहत्त्वाच्या प्रकरणांना दोन कामकाजाच्या दिवसांत प्राधान्याने सूचीबद्ध केले जाते. तसेच, सुट्टीच्या दिवशी किंवा रात्रीच्या वेळी असाधारण तातडी असल्यास सरन्यायाधीशांच्या मंजुरीने किंवा नियुक्त व्हॅकेशन ऑफिसरमार्फत तातडीची सुनावणी घेण्याची तरतूद आधीपासूनच अस्तित्वात आहे. सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी रात्री-अपरात्री सुनावणीसंदर्भातील व्यावहारिक अडचणी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यांनी उदाहरण देताना सांगितले की, रात्री उशिरा दाखल झालेल्या प्रत्येक याचिकेला तातडीचे स्वरूप देणे शक्य नसते आणि अशा परिस्थितीत तातडीचे वर्गीकरण करणे अवघड ठरते.

हा मुद्दा न्यायिक आदेशांपेक्षा प्रशासकीय व्यवस्थापनाचा असल्याचे मान्य करत सर्वोच्च न्यायालयाने स्वतंत्र २४ तासांची सुनावणी यंत्रणा उभारण्याची मागणी फेटाळून लावत जनहित याचिका निकाली काढली.

## पेटीएम पेमेंट्स बँकेचा अखेर पडदा; न्यायालयाच्या आदेशानंतर बँक बंद, लाखो वापरकर्त्यांपुढे नवे प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । वृत्तसंस्था**

देशातील डिजिटल पेमेंट क्षेत्रातील एकेकाळची आघाडीची संस्था असलेल्या पेटीएम पेमेंट्स बँकेच्या बंद होण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने बँकेच्या विसर्जनाची (वाइंडिंग-अप) प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले असून, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) परवाना रद्द करण्याच्या निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब झाले आहे.

आरबीआयने एप्रिलमध्ये पेटीएम पेमेंट्स बँकेचा बँकिंग परवाना रद्द केल्यानंतर न्यायालयात बँक बंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची मागणी केली होती. न्यायालयाने माजी स्टेट बँक अधिकारी गिरीकुमार एम. नायर यांची अधिकृत परिसमापक म्हणून नियुक्ती केली असून, ते बँकेच्या सर्व व्यवहारांची आणि मालमत्तेच्या विल्हेवाटीची प्रक्रिया पाहणार आहेत.

आरबीआयने यापूर्वीच बँकेचे व्यवहार ठेवीदारांच्या हिताला बाधा पोहोचेल अशा पद्धतीने चालविल्याचा आरोप केला होता. मार्च २०२२ मध्ये नव्या ग्राहकांची नोंदणी थांबविण्याचे आदेश देण्यात आले होते, तर जानेवारी २०२४ पासून नव्या ठेवी स्वीकारण्यासही बंदी घालण्यात आली होती. सातत्याने नियमांचे पालन न केल्यामुळे अखेर बँकेचा परवाना रद्द करण्यात आला.

या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम पेटीएम पेमेंट्स बँकेच्या ग्राहकांवर होणार आहे. ज्या ग्राहकांची खाती, बचत ठेवी किंवा इतर बँकिंग सेवा या बँकेशी जोडलेल्या होत्या, त्यांना परिसमापन प्रक्रियेदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन करावे लागणार आहे. नियमित डिजिटल व्यवहार करणाऱ्या ग्राहकांना पर्यायी बँकिंग व्यवस्था स्वीकारावी लागू शकते.

तज्ज्ञांच्या मते, ही कारवाई केवळ एका बँकेच्या बंद होण्यापुरती मर्यादित नाही. भारतातील डिजिटल बँकिंग क्षेत्रात नियामक नियमांचे काटेकोर पालन किती महत्त्वाचे आहे, याचा हा मोठा संदेश आहे. तसेच, वेगाने वाढणाऱ्या फिनटेक कंपन्यांसाठीही पारदर्शकता, अनुपालन आणि ग्राहकांच्या हिताचे संरक्षण यांना पर्याय नसल्याचे या निर्णयातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## पंतप्रधान मोदींची पोस्ट हटविल्याने केंद्र सरकार आक्रमक; मेटाला माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे समन्स

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

परीक्षांतील प्रश्नपत्रिका गळतीविरोधात कठोर कारवाईचे आश्वासन देणारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची फेसबुक पोस्ट हटवल्याप्रकरणी केंद्र सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने (चशळींध) मेटाच्या जागतिक सार्वजनिक धोरण प्रमुखांना समन्स बजावले असून या प्रकरणाचा खुलासा मागविण्यात आला आहे.

ही व्हिडीओ पोस्ट २३ जुलै रोजी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध करण्यात आली होती. या संदेशात पंतप्रधान मोदी यांनी तरुणांना उद्देशून प्रश्नपत्रिका गळती रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, ही पोस्ट फेसबुकवरून हटविण्यात आल्याने वाद निर्माण झाला.

सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणी स्पष्टीकरण देण्यासाठी मेटाच्या जागतिक सार्वजनिक धोरण प्रमुखांना माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने पाचारण केले आहे.

दरम्यान, मेटाच्या प्रवक्त्याने ही पोस्ट चुकून हटविण्यात आली होती असे सांगत ती तातडीने पुन्हा फेसबुकवर उपलब्ध करून देण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.

या घटनेनंतर सामाजिक माध्यम कंपन्यांच्या उत्तरदायित्वाचा आणि सार्वजनिक हिताच्या माहितीच्या व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, केंद्र सरकार या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत असल्याचे संकेत मिळत आहेत.


## ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताची दमदार कामगिरी; शर्मिला धानकरचे ऐतिहासिक सुवर्ण, अनेक पदकांची कमाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ग्लासगो । वृत्तसंस्था**

ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताने शानदार कामगिरी करत पदकांची कमाई सुरूच ठेवली आहे. पॅरा ॲथलेटिक्समध्ये शर्मिला धानकर यांनी इतिहास रचत भारताला पहिले सुवर्णपदक मिळवून दिले, तर उंच उडीपटू सर्वेश कुशारे आणि वेटलिफ्टर्स वल्लुरी अजय बाबू तसेच ज्ञानेश्वरी यादव यांनी रौप्यपदके जिंकून भारताच्या यशात भर घातली.

महिलांच्या एफ-५७ गोळाफेक स्पर्धेत शर्मिला धानकर यांनी ९.८१ मीटर अंतराची हंगामातील सर्वोत्तम फेक नोंदवत सुवर्णपदकावर




नाव कोरले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात पॅरा ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या त्या पहिल्या भारतीय खेळाडू ठरल्या. त्यांच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारतीय क्रीडा इतिहासात आणखी एका सुवर्णक्षणाची नोंद झाली आहे.

याशिवाय, उंच उडी स्पर्धेत सर्वेश कुशारे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. वेटलिफ्टिंगमध्ये वल्लुरी अजय बाबू आणि ज्ञानेश्वरी यादव यांनीही दमदार प्रदर्शन करत प्रत्येकी एक रौप्यपदक भारताच्या खात्यात जमा केले.

भारतीय खेळाडूंच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताची पदकतालिकेतील स्थिती अधिक बळकट झाली असून, आगामी स्पर्धांमध्येही आणखी पदकांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मुख्यमंत्र्यांचे आदेश कागदावरच राहू नयेत! ˙ विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करा; पोलिसांनी त्वरित अंमलबजावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । विशेष प्रतिनिधी**

नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणानंतर देशभरात उभ्या राहिलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात आंदोलक विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री ृशींशपवऑर ऋवपर्रीळी यांनी पोलीस प्रशासनाला दिल्याची माहिती समोर आली आहे.

या निर्णयामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये दिलासा व्यक्त केला जात असला, तरी केवळ आदेश जाहीर करून उपयोग नाही; त्याची तातडीने आणि प्रामाणिक अंमलबजावणी होणे तितकेच महत्त्वाचे आहे, अशी भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

आंदोलनादरम्यान अनेक विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले. अनेकांना तासन्तास ताब्यात ठेवण्यात आले. आता जर सरकारची भूमिका गुन्हे मागे घेण्याची असेल, तर पोलिसांनीही त्याच भूमिकेनुसार वागणे आवश्यक आहे.

आदेशाची अंमलबजावणी होईपर्यंत नवीन दडपशाही, नोटिसा किंवा अनावश्यक कारवाई टाळली पाहिजे, अशी मागणी होत आहे.

मुख्यमंत्र्यांनी संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून निर्णय घेण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले जात आहे. मात्र, प्रश्न आदेशाचा नाही, तर अंमलबजावणीचा आहे. विद्यार्थी अजूनही गुन्ह्यांच्या छायेत राहणार असतील, तर सरकारी घोषणांचा अर्थ काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

सरकारने विद्यार्थ्यांवरील कारवाईचा फेरआढावा घेण्याचा निर्णय घेतला असेल, तर राज्यभरातील पोलीस यंत्रणेला स्पष्ट सूचना देऊन मुख्यमंत्री जाहीर केलेल्या भूमिकेचा आदर राखणे आवश्यक आहे. अन्यथा एका बाजूला गुन्हे मागे घेण्याची घोषणा आणि दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांवर सुरू असलेली कारवाई, असा विरोधाभास निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

विद्यार्थी गुन्हेगार नाहीत; ते न्याय आणि पारदर्शकतेची मागणी करणारे नागरिक आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या निर्देशांचे केवळ स्वागत नव्हे, तर त्याची तात्काळ, पारदर्शक आणि राज्यभर एकसमान अंमलबजावणी हीच खरी कसोटी ठरणार आहे.

# अहमदाबाद विमान दुर्घटनेचा अहवाल अजूनही प्रतीक्षेत; सर्वोच्च न्यायालयाचे सरकारला सवाल, वैमानिक संघटनेचे पुरावेही

### २८ दिवसांच्या देशव्यापी आंदोलनानंतर घडामोड; विरोधकांनी नैतिक जबाबदारीचा मुद्दा लावून धरला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अहमदाबाद येथील एअर इंडियाच्या भीषण विमान दुर्घटनेच्या चौकशीवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवत सरकारला अधिक पारदर्शक भूमिका घेण्याचे संकेत दिले. न्यायालयाने विमान अपघात चौकशी ब्युरो (एएआयबी) ला भारतीय वैमानिक महासंघाने (ऋशवशअॅरींळेप ेष खपवळरप झळश्रेींी) सादर करू इच्छित असलेल्या संबंधित माहितीचाही विचार करण्यास सांगण्याचे निर्देश केंद्र सरकारला दिले.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, अपघाताच्या चौकशीचा भाग म्हणून चारहून अधिक सिम्युलेशन चाचण्या पूर्ण झाल्या असून, अंतिम चौकशी अहवाल सप्टेंबरच्या मध्यापर्यंत किंवा उशिरात उशिरा ऑक्टोबरअखेर सादर होण्याची अपेक्षा आहे.

१२ जून २०२५ रोजी अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर काही क्षणांतच एअर इंडियाचे विमान कोसळून २६० जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेची स्वतंत्र आणि न्यायालयीन देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सुनावणी सुरू आहे. मृत वैमानिक सुमित सभरवाल यांच्या वडिलांनीही याचिका दाखल केली आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने वरिष्ठ वकील गोपाल शंकरनारायण यांनी अमेरिकेतील एका विधी संस्थेच्या विश्लेषणाचा उल्लेख करत, विमानातील रॅम एअर टर्बाइन (ठअढ) जमिनीवर असतानाच कार्यान्वित झाल्याची शक्यता व्यक्त केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, या निष्कर्षांमुळे केवळ वैमानिकांच्या कथित चुकीमुळे अपघात झाला, हा दावा प्रश्नचिन्हाखाली येऊ शकतो.

यावर न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी एएआयबीने या निष्कर्षांची विश्वासार्हता तपासून त्यावर स्पष्ट मत नोंदवावे, असे निरीक्षण व्यक्त केले. तसेच, चौकशी सुरू असल्याने न्यायालयाने सध्या स्वतंत्र चौकशीचे आदेश दिले नसले, तरी अंतिम अहवाल समाधानकारक न ठरल्यास पुढील पर्याय खुले असल्याचेही स्पष्ट केले.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने एएआयबीने आतापर्यंत अंतरिम अहवाल का सादर केला नाही, यावरही अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर आता अंतिम अहवालातील निष्कर्ष, चौकशीची पारदर्शकता आणि सर्व उपलब्ध पुराव्यांचा विचार झाला का, याकडे पीडित कुटुंबीयांसह संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# विद्यार्थी आंदोलनानंतर सरकारला सोशल मीडियाची आठवण?; प्रश्नपत्रिका गळती रोखता आली नाही, आता डिजिटल व्यासपीठांवर संसदीय समितीची नजर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशभरातील विद्यार्थी आंदोलन, प्रश्नपत्रिका गळती प्रकरण आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर केंद्र सरकारने आता सोशल मीडिया आणि डिजिटल व्यासपीठांच्या नियमनाकडे लक्ष केंद्रित केले आहे. ३ ऑगस्ट रोजी संसदेच्या दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विषयक स्थायी समितीची महत्त्वाची बैठक होणार असून, सोशल मीडिया कंपन्यांची भूमिका, गोपनीयता, सार्वजनिक सुव्यवस्था आणि नियमन या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्या अध्यक्षतेखालील या समितीसमोर इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, गृह मंत्रालय तसेच स्नॅपचॅट, गूगल, एक्स (पूर्वीचे ट्विटर) आणि मेटा (फेसबुक व इन्स्टाग्राम) यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. सामाजिक आणि डिजिटल माध्यमे तसेच त्यांचे नियमन हा बैठकीचा मुख्य विषय असणार आहे.

मात्र या निर्णयामुळे सरकारच्या प्राधान्यक्रमांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. देशभरात लाखो विद्यार्थ्यांना



रस्त्यावर उतरावे लागले, प्रश्नपत्रिका गळतीच्या घटनांनी शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हादरला आणि अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. अशा परिस्थितीत शिक्षण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्याऐवजी सरकारचे लक्ष सोशल मीडिया नियमनाकडे वळल्याची टीका विरोधकांकडून होत आहे.

सरकारच्या भूमिकेचे समर्थन करणाऱ्यांचे म्हणणे आहे की, मोठ्या आंदोलनांच्या काळात सामाजिक माध्यमांवर चुकीची माहिती, अफवा आणि दिशाभूल करणारी सामग्री वेगाने पसरू शकते. त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी आणि नागरिकांच्या गोपनीयतेचे संरक्षण करण्यासाठी डिजिटल व्यासपीठांवर स्पष्ट नियम असणे आवश्यक आहे.

दुसरीकडे, टीकाकारांचा प्रश्न वेगळाच आहे. आंदोलनाची मूळ कारणे – प्रश्नपत्रिका गळती, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, विद्यार्थ्यांमधील असंतोष आणि उत्तरदायित्वाचा अभाव – यावर प्रभावी उपाययोजना करण्याऐवजी सरकार चर्चेचा केंद्रबिंदू सोशल मीडियाकडे वळवत आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रश्नपत्रिका गळतीविरोधातील फेसबुक पोस्ट काही काळ हटविल्यानंतर माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने मेटाच्या जागतिक सार्वजनिक धोरण प्रमुखांना समन्स बजावल्याची घटनाही समोर आली आहे. त्यामुळे सरकार आणि डिजिटल कंपन्यांमधील तणाव अधिक स्पष्ट झाला आहे.

आता ३ ऑगस्टच्या बैठकीत सरकार डिजिटल व्यासपीठांच्या उत्तरदायित्वावर नेमकी कोणती भूमिका मांडते आणि त्याचवेळी विद्यार्थ्यांच्या मूळ प्रश्नांवर ठोस कृती आराखडा जाहीर करते का, याकडे देशाचे लक्ष लागले आहे. कारण प्रश्न केवळ सोशल मीडिया नियंत्रित करण्याचा नाही, तर शिक्षण व्यवस्था आणि तरुणांचा सरकारवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्याचाही आहे.